# -: <u>प्रेसनोट</u> :- दिनांक :- ०१/०६/२०२०

# सोलापूर ग्रामीण घटक

---

सोलापूर ग्रामीण जिल्हयामध्ये कोरोना विषाणूचा प्रार्दूभाव होवू नये/प्रसार होवू नये याकरीता पुढील कालावधीत करावयाचे उपाययोजना संदर्भात पोलीस विभाग, महसुल विभाग,आरोग्य विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारी यांची श्री. संजीव जाधव, अपर जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे अध्यक्षतेखाली अक्कलकोट, दक्षिण सोलापूर व उत्तर सोलापूर तालुक्यांसाठी समन्वय बैठक दि.३१/०५/२०२० रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे तसेच मोहोळ, पंढरपूर, मंगळवेढा, सांगोला व माळशिरस तालुक्यासाठी दि.०१/०६/२०२० रोजी पंढरपूर येथे बैठक पार पडली आहे. सदर बैठकीकरीता डॉ. श्री. ढेले, जिल्हा शल्यचिकित्सक तसेच डॉ. श्री. जामदार, जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, सोलापूर हे उपस्थित होते.

सोलापूर ग्रामीण घटकाचे पोलीस अधीक्षक श्री.मनोज पाटील यांनी सर्व उपस्थितांना कोव्हिड १९ विषांणूचा प्रसार रोखणेकामी सर्व विभागांनी मिळून करावयाच्या कार्यवाहीबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी १) कोरोना बाधित रूग्णांचे कॉन्टॅक्ट ट्रेसिंग, २) प्रतिबंधित क्षेत्राची प्रभावीपणे अंमलबजावणी, ३) स्थलांतरित व्यक्तींबाबत करावयाची उपाययोजना या विषयांवर चर्चा करून **Chase the Virus** ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्याचे अवाहन केले आहे.

**१) <u>कोरोना बाधित रूग्णांचे कॉन्टॅक्ट ट्रेसिंग</u> :-**

कोरोना बाधित रूग्ण मिळून आल्यास त्याचे संपर्कातील हाय रिस्क व लो रिस्क रूग्णाव्यतिरिक्त सेकंडरी कॉन्टॅक्ट शोधून त्यांचे प्राधान्याने (**Aggressive**) कॉन्टॅक्ट ट्रेसिंग करून त्यांचे तात्काळ विलगिकरण करण्यात यावे. कोरोना बाधित रूग्णांचे कॉन्टॅक्ट ट्रेसिंग आरोग्य विभाग तसेच पोलीस विभाग यांचेकडून स्वतंत्रपणे तसेच एकत्रितरित्या करण्यात यावे. कोरोना बाधित रूग्णांच्या संपर्कातील व्यक्तींना कोरोना आजाराबाबत लक्षणे दिसत असल्यास त्यांचे तात्काळ स्वॅब तपासणी करून घ्यावी. कोरोना बाधिताच्या संपर्कातील व्यक्ती इतर जिल्हयातील असल्यास त्याबाबत संबंधित जिल्हा प्रशासनास कळविण्यात यावे अन्यथा संबंधित तालुका प्रशासनाने संपर्कातील व्यक्तींचे विलगीकरण करून पुढील कार्यवाही करावी. **प्रतिबंधित क्षेत्राच्या आजू बाजूस ७ कि.मी. पर्यतचा परिसर हा बफर झोन म्हणून जाहिर करण्यात** येवून सदर क्षेत्रातील सर्व शासकीय व खाजगी दवाखाने तसेच सर्व प्रकारची औषध दुकाने यांनी **उच्च रक्तदाब, मघुमेह, कर्करोग, सर्दी, ताप, खोकला तसेच I.L.I. आणि SARI** अशा प्रकारची लक्षणे असणा-या इसमांची माहिती तात्काळ तालुका आरोग्य अधिकारी यांना कळवावी. तसेच कोव्हिड १९ विषाणूचा संसर्ग रोखणेकामी जास्तीत जास्त रूग्णांची स्वॅब तपासणी करण्याची आवश्यकता यावेळी त्यांनी समजावून सांगितली.

**२) <u>प्रतिबंधित क्षेत्राची प्रभावीपणे अंमलबजावणी</u>**

कोरोना बाधित रूग्ण सापडल्यास इन्सिडंट कमांडर यांनी आजूबाजूच्या परिसरास तात्काळ प्रतिबंधित क्षेत्र जाहीर करून स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्रतिबंधित क्षेत्रास बॅरिकेडींग करावे. **प्रतिबंधित क्षेत्राच्या आजू बाजूस ७ कि.मी. पर्यतचा परिसर हा बफर झोन म्हणून जाहिर करण्यात यावा.** तसेच प्रतिबंधित क्षेत्रातील **I.L.I. आणि SARI** ची लक्षणे असणारे तसेच उच्च रक्तदाब, मघुमेह, कर्करोग इत्यादी अति गंभिर आजार असणारे लोक त्याचप्रमाणे

तसेच **Co morbid** व्यक्ती, वयस्कर लोक व लहान मुले यांचे विलगीकरण करण्यासाठी योग्य कार्यवाही करण्यात यावी. प्रतिबंधित क्षेत्रामध्ये नागरिकांच्या हालचालींवर निर्बंध आणून केवळ जीवनावश्यक सेवा पुरविणेकरीता स्वयंसेवक तसेच कोव्हिड वॉरियर्स यांची मदत घेण्यात यावी तसेच परिसरात स्वच्छतेच्या चांगल्या सवयींबाबत नागरिकांमध्ये जागृती करावी.

**३) <u>स्थलांतरित व्यक्तींबाबत करावयाची उपाययोजना</u>**

सोलापूर जिल्हयात येणा-या स्थलांतरीत व्यक्तींची १) परवाना धारक आंतरजिल्हा प्रवास करणारे, २) विनापरवाना आंतरजिल्हा प्रवास करणारे, ३) सोलापूर शहरातून ग्रामीण जिल्हयात येणारे, ४) जिल्हा आंतर्गत प्रवास करणारे अशा प्रकारे वर्गवारी करण्यात आली असुन जिल्हयाचे सिमेवर नेमण्यात आलेल्या नाकाबंदीचे ठिकाणी अशा स्थलांतरित इसमांची माहिती मोबाईल ॲपलिकेशनद्वारे संकलित करण्यात येते विनापरवाना जिल्हयात प्रवेश करणा-या इसमांची माहिती संबंधित ग्राम समिती व अंगणवाडी/आशा सेविका यांचेकडून संकलित करण्यात येत आहे. सोलापूर जिल्हयात प्रवेश करणा-या प्रत्येक इसमांची **नाकाबंदी ठिकाणी, हॉस्पीटलमध्ये, प्रतिबंधित क्षेत्रामध्ये वैदयकीय तपासणी** करण्यात येत असुन आवश्यकते प्रमाणे त्यांना गृह अथवा संस्थात्मक विलगिकरणात ठेवण्यात येत आहे.

पोलीस विभाग, महसुल विभाग,आरोग्य विभाग व स्थानिक स्वराज्य संस्था या विभागाच्या समन्वय बैठकीमध्ये सोलापूर ग्रामीण जिल्हयात करण्यात येणा-या विविध उपाययोजनेमुळे कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यास व विषाणूची साखळी तोडण्यास जिल्हा प्रशासन यशस्वी होईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

- **कोरोना अनुषंगाने दाखल झालेल्या गुन्हयांची माहिती -**

| अक्र | तपशिल | गुन्हे |
|---|---|---|
| १ | बेकायदेशिर जिल्हा प्रवेश | ५९४ (आरोपी २८२९) |
| २ | क्वारंटाईन आदेशाचा भंग | २२ (आरोपी ४१) |
| ३ | कंटेनमेट झोन आदेश भंग | ४ (आरोपी ८) |
| ४ | इतर गुन्हे | ११९० |
| | **एकुण गुन्हे** | **१८१०** |

प्रति,

सर्व दैनिक वृत्तपत्र संपादक, सोलापूर.